सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १२७ | बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे
अभीष्टचिंतन





श्री. उमेश कोठावदे
बिल्डर, पुणे



श्रीमती. भारती गाला
माजी नगरसेवक, अमळनेर



श्री. महेश कोठावदे
व्यापारी, अमळनेर



श्री. जितेंद्र कटारिया
अमळनेर

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

## दिनविशेष
२८ जानेवारी

- मराठी राज्याच्या राजमुद्रेचा वापर करून लिहिलेले शिवाजी महाराजांचे पहिले पत्र उपलब्ध.
- एच. एम. टी. वॉच फॅक्टरी, भारतातील पहिला घड्याळ कारखाना, बंगळुरूमध्ये उघडण्यात आला.

## प्रजासत्ताक दिन चिरायू...!



अमळनेर : प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवारी पालिका माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य सादर करताना के. डी. गायकवाड शाळेच्या विद्यार्थिनी.

(आणखी छायाचित्रे व बातमी पान ३ वर..)

# वरवर स्वच्छता आतून भंगार बाजार!

## तहसील, प्रांताधिकारी आवारातील स्थिती; वाहनांची विल्हेवाट लावण्याची मागणी





ग्लोबल महातेज

अमळनेर महसूल आवारात वाळू जप्तीची वाहनेच झाली कचरा कुंड्या

दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव; महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष



ग्लोबल महातेज

प्रांत, तहसील, दस्त नोंदणी कार्यालयांचा श्वास गुदमरला

सामाजिक कार्यकर्ते संदीप घोरपडे यांनी प्रशासनावर ओढले ताशेरे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील तहसील व प्रांताधिकारी कार्यालयाच्या आवारातील साफसफाई केवळ वरवर व दिखाऊ स्वरूपाची आहे. मात्र, जप्तीच्या वाहनांची अद्यापही विल्हेवाट न लागल्याने हे आवार जणू भंगार बाजारात असल्याचा भास होत आहे.

प्रशासनाने कायमस्वरूपी स्वच्छता करून आवार चकाचक करावे. आवारातील वाहनांची लवकर विल्हेवाट लावावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

प्रशासनाकडून प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून केवळ दिखाऊपणा म्हणून वरवरची साफसफाई केली. ठराविक ठिकाणचाच कचरा उचलण्यात आला. बहुतांशी भागात अद्यापही कचरा, भंगार झालेली जप्तीची वाहने जैसे- थे दिसून येत आहे. विशेष म्हणजे तहसील आवारातील जवळपास प्रत्येक कार्यालयाच्या दालनासमोर ही भंगार वाहने अजूनही उभी आहेत. नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ज्येष्ठ नागरिकांना कोणते कार्यालय कुठे आहे, याची माहिती मिळणेही कठीण झाले आहे. परिणामी कामासाठी आलेले नागरिक संभ्रमात आहेत. सद्यस्थितीत फक्त प्रांताधिकारी यांच्या दालनाचा परिसर वगळता उर्वरित सर्व ठिकाणी अस्वच्छता व भंगार बाजाराचे स्वरूप आहे.

### दै. ग्लोबल महातेज आहे लक्ष ठेवून

दै. ग्लोबल महातेजने मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी 'अमळनेर महसूल आवारात वाळू जप्तीची वाहनेच झाली कचरा कुंड्या' या शिर्षकाखाली, तर बुधवार, दि. २१ जानेवारी रोजी 'प्रांत, तहसील, दस्त नोंदणी कार्यालयांचा श्वास गुदमरला' या शिर्षकाखाली बातमी प्रकाशित करून या समस्येस वाचा फोडली आहे. त्यानंतर प्रशासनाने वरवर फक्त दिखावू स्वच्छता केली आहे. मात्र, वाहने तशीच पडून असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. याबाबत गांभिर्याने कारवाई, व्हावी अशी अपेक्षा सर्वत्र व्यक्त होत आहे.



जळगाव : दिनेश बागडे यांना गुणवंत खेळाडू पुरस्काराने सन्मानित करताना पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील.

# गुणवंत खेळाडू पुरस्काराने दिनेश बागडे सन्मानित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील दिनेश बागडे यांना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे गुणवंत खेळाडू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या हस्ते जळगाव येथे सोमवार, दि. २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताकदिनी त्यांचा सन्मान करण्यात आला.

दिनेश बागडे यांनी उत्तराखंड येथे झालेल्या पॅरा पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत १०७ किलो वजन गटात रौप्य पदक मिळविले होते. या पार्श्वभूमीवर त्यांना 'गुणवंत खेळाडू' पुरस्कार देण्यात आला आहे. पाकलमंत्री ना. गुलाबराव पाटील, जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक आदी उपस्थित होते.

# लोकहिताचा संकल्प, विकासाचा विश्वास!

## आमदार अनिलदादा पाटलांनी केली प्रशासकीय इमारतीच्या कामाची पाहणी



अमळनेर : प्रशासकीय इमारतीच्या कामाची पाहणी करताना आमदार अनिलदादा पाटील. शेजारी सौ. जयश्रीताई पाटील, प्रांताधिकारी मयूर भंगाळे व पदाधिकारी.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आमदार अनिलदादा पाटील यांनी सर्व शासकीय कार्यालये एकाच छताखाली आणण्यासाठी प्रशासकीय इमारतीसाठी निधी मंजूर करून आणला आहे. या इमारतीचे काम प्रगतीपथावर असून, आमदार अनिलदादा पाटील यांनी सोमवार, दि. २६ जानेवारी रोजी इमारतीच्या बांधकामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचनाही दिल्या.

याप्रसंगी माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा व पोलीस अधिकारी, विविध खात्यांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. ही इमारत पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना एकाच छताखाली सर्व प्रशासकीय सुविधा उपलब्ध होणार आहेत. याचा मला मनस्वी आनंद वाटतो. नागरिक केंद्रित, पारदर्शक व गतिमान प्रशासनाच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, अशा भावना आमदार अनिलदादा पाटील यांनी व्यक्त केल्या.

## प्रजासत्ताक दिन सजावट



अमळनेर : प्रजासत्ताक दिनानिमित्त श्री मंगळग्रह मंदिरात करण्यात आलेली मनमोहक सजावट.
(छायाचित्र : मयूर चौधरी)

# शेतकऱ्यांचा अत्यल्प प्रतिसाद; ५९ हजार पीक प्लॉट पाहणी प्रलंबित

## ग्राम महसूल अधिकारीच थेट बांधावर जावून पीक पाहणी करणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : ॲग्रीस्टॅक योजनेतून शेतकऱ्यांच्या स्तरावर पीक पाहणीची मुदत सोमवार, दि. २६ जानेवारी रोजी संपली आहे. या पाहणीत शेतकऱ्यांचा निरूत्साह दिसून आला आहे. तालुक्यातील एकूण ७६ हजार प्लॉट पैकी केवळ १६ हजार प्लॉट पीक पाहणी प्रयोग पूर्ण झाले आहेत. तब्बल ५९ हजार पीक पाहणी प्लॉट प्रलंबित आहे. या पार्श्वभूमीवर आता महसूल अधिकारीच थेट बांधावर जावून पीक पाहणी करणार आहेत. सहायकांना एकल पीकासाठी प्रति प्लॉट १० रुपये, तर मिश्र पिकासाठी प्रति प्लॉट १२ रुपये मानधन देण्यात यणार आहे.

राज्यातील कृषी क्षेत्रातील डिजिटल सेवांचा प्रभावी वापरावर शासनाने भर दिला आहे. विविध योजनांचा जलदगतीने व परिणामकारकरीत्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे, असा शासनाचा

पान ३ वर

> **ज्या- त्या गावातील कोणीही सुशिक्षित तरुण ज्याला मोबाईलचे ज्ञान अवगत आहे तो सहाय्यक म्हणून काम करू शकेल. शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन त्याने जिओ टॅगिंग करून प्रत्यक्ष पिकाचे फोटो काढून पीक पाहणी करून डिसीएस ॲप वर नोंदणी करावयाची आहे. यासाठी त्याला एकल पिकाला प्रति प्लॉट १० रुपये आणि मिश्र पिकाला प्रति प्लॉट १२ रुपये मानधन देण्यात येईल. तरूणांनी याचा लाभ घेऊन, प्रशासनालाही सहकार्य करावे.**
> **- रुपेशकुमार सुराणा, तहसीलदार, अमळनेर.**



# इंजीनियर से ऑस्कर २०२६ तक का तय किया सफर

**सक्सेस स्टोरी**


## फिल्म होमबाउंड ने नीरज घेवाण को दिलाई वैश्विक पहचान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इंजीनियरिंग और एमबीए की डिग्री है, लेकिन खर्च चलाने के लिए फिल्मी ब्लॉग लिखते थे। गुलजार साहब के अंदाज के दीवाने नीरज घेवाण ३५ साल तक अपनी जिस जातिगत पहचान को छिपाए रहे, आज वंचित वर्गों के उन्हीं लोगों की कहानियों को परदे पर उतारकर भारतीय सिनेमा में अपनी एक सार्थक छाप छोड़ रहे हैं।

बात नब्बे के दशक की है। शाम ढल चुकी थी और एक साधारण-सा मध्यमवर्गीय परिवार दूरदर्शन पर चल रही फिल्म में डूबा हुआ था। रिमोट सबसे बड़ी बहन के हाथ में था, जिसे कलात्मक फिल्में पसंद आती थीं। कलात्मक फिल्में यानी हकीकत पर आधारित छोटी बजट की फिल्में। कमरे के एक कोने में, चुपचाप बैठा एक छोटा-सा लड़का भी परदे से नजरें हटाए बिना सब कुछ देख रहा था। पर शायद वह यह नहीं जानता कि कहानी क्या कह रही है, पर उसने इतना जरूर महसूस किया कि इन दृश्यों में कुछ तो ऐसा है, जो दिल के किसी अनछुए कोने को झकझोर रहा है। वक्त बीतता गया और वह लड़का भी बाकी लोगों की तरह घर-परिवार तथा समाज की धारा में बहता चला गया। उसने एक ऐसी नौकरी पा ली, जहां हर सुख-सुविधा थी। लेकिन उसके भीतर कहीं एक खाली जगह भी थी, मानो जैसे बचपन में कोने में बैठा वह बच्चा, रास्ते में कहीं छूट गया हो। उसी खालीपन को साथ लेकर वह सपनों की नगरी मुंबई पहुंचता है। वहां भी बेचैनी कम नहीं होती। फिर अचानक एक दिन फोन की घंटी बजती है और उसे अनुराग कश्यप का सहायक बनने का ऑफर मिलता है। उस एक कॉल ने उसके भीतर चल रही उथल-पुथल को दिशा दे दी।

ठीक उसी शाम उसके पिता का भी फोन आता है, जो बताते हैं कि उसे देखने लड़की वाले आने वाले हैं। पर उसने यह बताते हुए मना कर दिया कि मैंने नौकरी से इस्तीफा दे दिया है और अब मैं सहायक निर्देशक बनने जा रहा हूं। उसी क्षण उसका वर्षों का खालीपन जिद और जुनून में बदल जाता है। यही जुनून आगे चलकर २०१५ में मसान फिल्म के रूप में परदे पर उतरता है, जिसने भारतीय सिनेमा की संवेदनशीलता की भाषा ही बदल दी। वह लड़का कोई और नहीं, बल्कि भारत की आधिकारिक एंट्री के रूप में ऑस्कर २०२६ में बेस्ट इंटरनेशनल फीचर फिल्म श्रेणी के लिए शॉर्टलिस्ट की गई फिल्म होमबाउंड के निर्देशक नीरज घेवाण हैं।



### शुरुआत

नीरज घेवाण का जन्म १९८० में हैदराबाद के एक महाराष्ट्रीयन माता-पिता के घर हुआ था। उनके पिता एक शोध वैज्ञानिक थे और मां एक गारमेंट स्टोर चलाती थीं। तीन बहनों के बाद जन्मे इकलौते बेटे के रूप में उन्हें मां-दादी का खास प्यार मिला। उन्होंने अपनी प्रारंभिक शिक्षा केंद्रीय विद्यालय, शिवरामपल्ली, हैदराबाद से पूरी की। इसके बाद उन्होंने चैतन्य भारती इंस्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी से इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग में डिग्री हासिल की और फिर सिम्बायोसिस इंस्टीट्यूट ऑफ बिजनेस मैनेजमेंट, पुणे से एमबीए (मार्केटिंग) किया। उन्होंने अपने कॅरिअर की शुरुआत यूटीवी न्यू मीडिया, हिंदुस्तान टाइम्स और टेक महिंद्रा जैसी कंपनियों में इंजीनियरिंग जॉब्स से की। लेकिन बाद में पैशन फॉर सिनेमा डॉट कॉम जैसे ब्लॉग के लिए फिल्म समीक्षा लिखना शुरू कर दिया।

### फिल्मों का सफर

नीरज घेवाण ने २०१० में शॉर्ट फिल्म 'इंडिपेंडेंस' बनाई। अनुराग कश्यप के निर्देशन में 'गैंग्स ऑफ वासेपुर' और 'अग्ली' में सहायक निर्देशक बने। २०१५ में उनकी पहली निर्देशित फिल्म 'मसान' ने कान्स में दो अवॉर्ड जीते, फिर २०१७ की 'जूस' ने फिल्मफेयर बेस्ट शॉर्ट फिल्म का खिताब जीता। इसके अलावा, उन्होंने ओटीटी प्लेटफॉर्म नेटफ्लिक्स की लोकप्रिय सीरीज 'सेक्रेड गेम्स' और अमेजन प्राइम वीडियो के लिए 'मेड इन हेवन' के कई एपिसोड्स का निर्देशन किया। होमबाउंड फिल्म की प्रेरणा नीरज को पत्रकार बशारत पीर की 'द न्यूयॉर्क टाइम्स' में छपे एक लेख 'टेकिंग अमृत होम' से मिली। कान्स फिल्म फेस्टिवल में होमबाउंड की स्क्रीनिंग के बाद दर्शक अपनी सीटों से खड़े होकर करीब नौ मिनट तक लगातार तालियां बजाते रहे।

### अरहर की दाल व गुजराती संगीत

नीरज घेवाण का पसंदीदा खाना अरहर की दाल व चावल है। उन्हें बिरयानी खाने का भी शौक है। उन्हें गुजराती लोकगायकी पसंद है और वह अपने आप को बाथरूम सिंगर बताते हैं। नीरज अखबार तथा खबरों से जुड़े रहना पसंद करते हैं। उन्हें दो बीघा जमीन, प्यासा, बैंडिट क्वीन और ब्लैक फ्राइडे जैसी फिल्में बेहद पसंद हैं। खाली वक्त में वह बीयर पीते हुए फिल्में देखना पसंद करते हैं। उनकी ज्यादातर फिल्में सामाजिक कलंक, बहिष्कार, भेदभाव जैसे विषयों पर आधारित होती हैं।

### ३५ साल तक छिपाई पहचान

नीरज घेवाण ने ३५ साल तक अपनी दलित पहचान को छिपाए रखा, क्योंकि बचपन से ही उन्हें जातिगत भेदभाव का डर सताता था। कॉलेज व नौकरी के दौरान दोस्त और बाकी लोग उन्हें नीरज कुमार के नाम से जानते थे न कि नीरज घेवाण के। मसान की सफलता के बाद २०१६ में उन्होंने एक साक्षात्कार में अपनी दलित पहचान को उजागर किया। आज वह हिंदी सिनेमा के चुनिंदा दलित फिल्मकारों में से एक हैं, जो नागराज मंजुले जैसे निर्देशकों से प्रेरणा लेकर समाज के हाशिये पर खड़े लोगों की कहानियों को परदे पर लाते हैं।

# जितकी जास्त पिकलेली केळी, तितकेच जास्त फायदे?

**संशोधनातून समोर आले वास्तव!**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अतिपिकलेली केळी अधिक गोड, पचनासाठी हलकी आणि स्मूदी, ओट्स व बेकिंगसाठी उपयुक्त असल्याचे अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. अनेकदा सालीवर तपकिरी डाग असलेली केळी दिसताच ती फेकून देण्याचा विचार केला जातो. मात्र अतिपक्व झालेली केळी आरोग्यासाठी अधिक फायदेशीर ठरू शकतात, असे अलीकडील संशोधन आणि पोषणविषयक अभ्यास सूचित करतात. केळी जसजशी अधिक पिकतात, तसतसे त्यांच्यातील काही जैवसक्रिय घटक आणि अँटी-ऑक्सिडंट्सचे प्रमाण वाढत जाते. हे घटक शरीराच्या संरक्षणासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.



### अतिपिकलेल्या केळ्यांचे वैशिष्ट्य काय?

'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'मध्ये प्रसिद्ध झालेल्या अभ्यासानुसार, केळी पिकण्याच्या प्रक्रियेत त्यांच्यातील स्टार्चचे रूपांतर हळूहळू नैसर्गिक साखरेत होते. याच प्रक्रियेसोबत अँटी-ऑक्सिडंट्सची क्रियाशीलताही वाढते.

### मुक्त कण शरीरावर काय परिणाम करतात?

शरीरात तयार होणारे 'मुक्त कण' दाह वाढवितात, पेशींना हानी पोहोचवतात आणि अकाली वृद्धत्वासाठी कारणीभूत ठरतात. अँटी-ऑक्सिडंट्स हे मुक्त कण निष्क्रिय करून पेशी निरोगी ठेवण्यास मदत करतात.

### संशोधनातून काय समोर आले?

प्रयोगशाळा स्तरावर झालेल्या काही अभ्यासांमध्ये असे आढळून आले आहे की, अतिपिकलेल्या फळांमधील विशिष्ट संयुगे पेशींच्या नैसर्गिक कार्याला आधार देतात आणि शरीरातील पेशीय संतुलन राखण्यास मदत करतात.

### आहारातील महत्त्व

केळी हे कोणत्याही गंभीर आजार किंवा कर्करोगावर उपचार नसले तरी संतुलित आहाराचा भाग म्हणून त्यांचा समावेश केल्यास एकूण आरोग्याला चालना मिळू शकते.

### अतिपिकलेली केळी पचनासाठी का चांगली?

अतिपक्व केळी अधिक गोड असून पचनासाठी ती हलकी असतात. त्यामुळेच ती स्मूदी, ओट्स, केक तसेच आरोग्यदायी बेकिंगमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरली जातात. तज्ज्ञांच्या मते आहार केवळ पोट भरण्यापुरता मर्यादित नसून, तो शरीराला आवश्यक पोषण देतो. नैसर्गिक आणि संपूर्ण अन्नपदार्थांचे नियमित सेवन दीर्घकालीन आरोग्यासाठी फायदेशीर ठरते आणि अतिपक्व केळी हे याचे उत्तम उदाहरण आहे.

# वेल्क्रोचा शोध कधी व कोणी लावला?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वेलक्रो ही आज प्रत्येक ठिकाणी गरजेची गोष्ट बनली आहे. कपडे, रेनकोट, टोपी, बेल्ट अशा अनेक गोष्टींसाठी वेल्क्रो खूप उपयुक्त ठरते. बटन किंवा नाडी सोडबांध करताना खूप वेळ लागतो. यासाठी हे वेलक्रो खूप उपयुक्त ठरतात. सहज, सोप्या पद्धतीने कोणतीही गोष्ट हवी तशी अॅडजेस्ट करता येते. गोष्ट आहे १९४१ या वर्षाची. स्विस अभियंता जॉर्ज डी मेस्ट्रल हे आपल्या कुत्र्याला घेऊन फिरायला गेला होता. त्यावेळी त्याच्या कपड्यावर व कुत्र्यांच्या केसांना एक वनस्पतीच्या बिया चिकटल्या होत्या

ती वनस्पती होती 'बर्डोक' नावाच्या वनस्पतीच्या बिया. या बिया पाहून या इंजिनिअरच्या डोक्यात एक विचार चमकून गेला. त्यांनी कुतूहलापोटी त्या बिया मायक्रोस्कोपखाली पाहिल्या. त्यांना दिसले, की त्या बियांच्या टोकावर छोटे-छोटे 'हुक्स' होते. हे हुक्स कापडाच्या धाग्यांमध्ये किंवा केसांमध्ये घट्ट अडकत होते.

## नासामुळे वेलक्रो झाले जगप्रसिद्ध !



यावरूनच त्यांना 'हुक आणि लूप' ही कल्पना सुचली. त्यांनी विचार केला, की जर आपण कृत्रिमरीत्या असे हुक्स आणि लूप तयार केले, तर दोन गोष्टी एकमेकांना सहज जोडता येतील.

ही कल्पना प्रत्यक्षात आणणे सोपे नव्हते. अनेक प्रयोग केल्यानंतर त्यांनी नायलॉनचा वापर करून वेल्क्रो तयार केले. या शोधाला पूर्ण रूप देण्यासाठी त्यांना तब्बल १० वर्षे लागली आणि १९५५ मध्ये त्यांनी याचे पेटंट मिळविले. 'वेल्क्रो' हा शब्द दोन फ्रेंच शब्दांपासून बनला आहे. वेलोर्स म्हणजे (मखमल/वेल्वेट) व क्रोचेट (हुक) सुरूवातीला वेल्क्रोला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. मात्र, जेव्हा नासाने अंतराळवीरांच्या कपड्यांसाठी आणि सामानासाठी याचा वापर सुरू केला, तेव्हा वेल्क्रो जगभरात प्रसिद्ध झाले. बर्डोकच्या बियापासून शोध लागलेला वेलक्रो आज जगभरात बूट, बॅगा, वैद्यकीय उपकरणे आणि अंतराळ मोहिमा यासाठी वापरला जातो.

# तीन घरे, तीन ऑटो रिक्षा, लक्झरी कार अन् कोट्यवधींची संपत्ती

## व्यापाऱ्यांना कर्ज देणाऱ्या श्रीमंत भिकाऱ्याची रंगतेय चर्चा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



रस्त्यावर लाकडी फळीवर सरपटत जाणारा एक हतबल अपंग माणूस, पाठीवर जुने फाटके दप्तर आणि मदतीसाठी केविलवाण्या नजरेने पाहणारा चेहरा... इंदूरच्या सराफा बाजारात गेली अनेक वर्षे हे दृश्य पाहून कोणालाही दया यायची. त्यामुळे लोक त्याला भिकारी समजून खिशातून पैसे काढून द्यायचे. पण कोणाला स्वप्नातही वाटले नसेल, की ज्या माणसाला आपण मदत करतोय, तो माणूस प्रत्यक्षात शहरातील एका मोठ्या व्यापाऱ्यालाही लाजवेल इतक्या संपत्तीचा मालक आहे. मात्र सत्य कधीच जास्त काळ लपून राहत नाही. सध्या या भिकाऱ्याची सोशल मीडियावर चर्चा सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मांगीलाल असे या श्रीमंत भिकाऱ्याचे नाव आहे. महिला आणि बालविकास विभागाच्या पथकाने जेव्हा मांगीलाल नावाच्या या भिकाऱ्याला रेस्क्यू केले तेव्हा तपासात एकामागून एक धक्कादायक खुलासे झाले. तो केवळ भिकारी नसून इंदूरमधील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या तीन आलिशान पयाघरांचा मालक निघाला. यामध्ये भगतसिंग नगरमधील १६ बाय ४५ फुटांची तीन मजली इमारत, शिवनगरमधील ६०० स्केअर फुटांचे घर आणि अलवास भागातील वन बीएचके घराचा समावेश आहे. आजच्या बाजारभावानुसार या मालमत्तांची किंमत कोटींच्या घरात आहे.

मांगीलालकडे फक्त घरेच नाही तर याहून अधिक मालमत्ता आहे. तपासादरम्यान समोर आले, की त्याच्याकडे स्वतःची डिझायर कार आणि तीन रिक्षा आहेत. विशेष म्हणजे तो स्वतः या गाड्या वापरत नसून त्या भाड्याने देऊन त्यातून मोठा नफा कमावत होता. शासनाने त्याला आधीच दिव्यांग कोट्यातून घर मिळवून दिले होते आणि तो एका आश्रमातही राहत होता. तरीही अधिक पैसा कमावण्याच्या हव्यासापोटी त्याने भीक मागण्याचे नाटक सुरूच ठेवले होते. सराफ बाजारात बसून भीक मागणे हेच त्याचे रोजचे काम होते. त्यामुळे तेथे येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मांगीलालवर कधीच संशय आला नाही. मांगीलाल हा फक्त भिकारी नसून त्याने मिळालेल्या पैशातून व्याजाचा मोठा व्यवसाय सुरू केला होता. तो दररोज सराफ बाजारात फक्त भीक मागण्यासाठी जात नव्हता, तर तेथील अनेकांना दिलेल्या कर्जाचे व्याज वसूल करण्यासाठी जायचा. भीक मागून आणि व्याजाचे पैसे मिळून त्याची रोजची कमाई ४०० ते ५०० रुपये व्हायची. 'मी कोणाकडेही जबरदस्तीने पैसे मागत नाही, लोक स्वतःहून देतात' असे त्याने चौकशीत कबूल केले.

दरम्यान, या भिकाऱ्याला ताब्यात घेतल्यानंतर प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. भिक्षावृत्ती निर्मूलन मोहिमेंतर्गत मांगीलालवर कठोर कारवाई केली जात आहे. जिल्हा कार्यक्रम अधिकारी रजनीश सिन्हा यांनी असे स्पष्ट केले, की संपत्ती असूनही गरिबीचे ढोंग करून लोकांची फसवणूक करणे हा गुन्हा आहे. अशा लोकांमुळे समाजातील खऱ्या गरजू व्यक्तींपर्यंत योग्य ती मदत पोहोचू शकत नाही. या घटनेने इंदूरमध्ये खळबळ उडाली असून, दानशूर नागरिकांनाही एखाद्या व्यक्तीला पैसे देण्यापूर्वी विचार करायला भाग पाडले आहे.



# दोन मिनिटांत झोप लागण्यासाठीच्या 'भन्नाट' ९ टिप्स

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

झोपण्याऐवजी जास्तीत जास्त वेळ डोळे उघडे ठेवण्याचा प्रयत्न करा. तुमचा मेंदू याउलट प्रतिक्रिया देऊन तुम्हाला लवकर झोपवेल.

### ४-७-८ श्वास तंत्र

४ सेकंद श्वास घ्या, ७ सेकंद रोखून धरा आणि ८ सेकंदात सोडा. यामुळे शरीराची 'नॅचरल ऑफ स्विच' सिस्टिम सक्रिय होते.

### मोजे घालून झोपा

पाय उबदार राहिल्याने रक्तवाहिन्या विस्तारतात आणि शरीराचे तापमान कमी होते. जो मेंदूसाठी झोपण्याचा संकेत असतो. त्यामुळे मोजे घालून झोपणे उत्तम.

### लष्करी पद्धत

चेहरा शिथिल करा, खांदे सैल सोडा आणि आपण बेडमध्ये खोलवर जात आहोत, अशी कल्पना करा. ही पद्धत सैनिक २ मिनिटांत झोपण्यासाठी वापरतात.

### विचित्र वस्तूंची कल्पना करा

घोडा, टोस्टर किंवा झाड अशा एकमेकांशी संबंध नसलेल्या वस्तू आठवा. यामुळे डोक्यातील विचारांचे चक्र थांबून मेंदू थकतो आणि शांत होतो.

### डोळे वर फिरवा

डोळे मिटून ते हळूच तीनदा वरच्या दिशेला वळवा. झोपेत डोळ्यांची नैसर्गिक हालचाल अशीच असल्याने मेंदूला आपण झोपलो आहोत, असे वाटते.

### स्नायूंना ताण देऊन सोडा

शरीराचा प्रत्येक स्नायू ५ सेकंद घट्ट आवळून धरा आणि एकदम सैल सोडा. या प्रक्रियेमुळे शरीरात शांततेची लाट पसरते.

### उशीची थंड बाजू

उशीची बाजू बदला आणि थंड बाजूवर डोके ठेवा. डोके थंड झाल्यामुळे मेंदू त्वरित झोपेच्या स्थितीत जातो.

### उलटी गणती


३०० पासून मागे ३-३ ने कमी करत मोजा (उदा. ३००, २९७, २९४...); हे काम मेंदूसाठी कंटाळवाणे असल्याने तुम्ही २०० पर्यंत पोहोचण्याआधी त्याची गणती करा.

# अभ्यासाचा कंटाळा येतोय? जाणून घ्या ६ ते ८ तास अभ्यास करण्याचे 'सिक्रेट'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवसभरात न कंटाळता ६ ते ८ तास अभ्यास करायचा असेल तर पुढील टिप्स उपयुक्त ठरतील.

- अभ्यासाला पहिल्याच दिवशी खूप तास बसण्याचा प्रयत्न करू नका.
- आधी दिवसभरात २-३ तास अभ्यासाची सवय लावा. त्यानंतरच हळूहळू वेळ वाढवा.
- सतत अभ्यास करण्याऐवजी सलग ५० मिनिटे मन लावून अभ्यास करा. त्यानंतर १० मिनिटांचा छोटा ब्रेक घ्या.
- एकाचवेळी अनेक गोष्टी करण्याचा प्रयत्न (मल्टिटास्किंग) करू नका.
- एका सत्रात फक्त एकाच विषयावर पूर्ण लक्ष केंद्रित करा.
- अभ्यास करताना केवळ वाचत बसू नका. उत्तरे लिहून काढा, संकल्पना स्वतःलाच मोठ्याने समजावून सांगा आणि वेळोवेळी स्वतःची छोटी परीक्षा घ्या.



- अभ्यासामध्ये जो ब्रेक घ्याल त्यात मोबाईल बघणे टाळा. त्याऐवजी थोडे चाला, पाणी प्या किंवा शरीर ताणून हलका व्यायाम करा.
- एकाच वेळी खूप मोठा अभ्यास पूर्ण करायचा दबाव घेऊ नका. दिवसाच्या सुरूवातीला छोटी पूर्ण करता येतील, अशी ध्येये ठरवा.
- अभ्याससोबतच शरीराला ७-८ तासांची चांगली झोप मिळणे आवश्यक आहे. एका दिवशी खूप अभ्यास करण्यापेक्षा रोज थोडा-थोडा पण नियमित अभ्यास करणे जास्त फायद्याचे ठरते

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com







अमळनेर : प्रजासत्ताक दिनानिमित्त पालिका माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात विविध सांस्कृतिक कार्यक्रम झाले. याप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालय, साने गुरुजी प्राथमिक विद्या मंदिर, इंदिरा गांधी विद्यालय व न्यू व्हीजन स्कूलचे विद्यार्थी-विद्यार्थिनी.



# प्रजासत्ताक दिनानिमित्त अमळनेरात राष्ट्रभक्तीचा जागर

## शासकीय, निमशासकीय, संस्थांमध्ये ध्वजवंदन, सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवार, दि. २६ जानेवारी रोजी येथील शासकीय, निमशाकीय कार्यालये, विविध शैक्षणिक संस्था व खासगी संस्थांमध्ये ध्वजवंदन व विविध कार्यक्रमातून राष्ट्रभक्तीचा जागर करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रम व चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांचे लक्ष वेधले होते.

### प्रशासकीय कार्यालय

प्रांताधिकारी कार्यालयाच्या आवारात प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. यावेळी तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, विविध महसूल खात्यांचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर पालिका माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात विविध सांस्कृतिक कार्यक्रम झाले. याप्रसंगी आमदार अनिलदादा पाटील, लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील, बाजार समितीचे सभापती अशोक पाटील, पालिकेचे बांधकाम सभापती साहेबराव पवार, जेष्ठ साहित्यिक कृष्णा पाटील, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, अर्बन बँकेचे चेअरमन भरत ललवाणी, विक्रांत पाटील, नगरसेविका स्वप्ना पाटील, डॉ. संदीप जोशी, उद्योगपती प्रवीण पाटील, खा. शि. मंडळाच्या संचालिका सौ. लीनाताई पाटील, संचालक जितेंद्र जैन आदी उपस्थित होते.



अमळनेर : प्रांताधिकारी कार्यालयाच्या आवारात ध्वजवंदन करताना प्रांताधिकारी मयूर भंगाळे. शेजारी तहसीलदार रुपेशकुमार सुराणा व विविध कार्यालयातील कर्मचारी.

यावेळी अवकाशात शेकडो तिरंगी फुगे सोडून राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली. स्वातंत्र्यसैनिकांचे कुटुंब आणि आणीबाणी काळात कारावास भोगलेल्या नागरिकांचा शासनातर्फे सन्मान करण्यात आला. यावेळी विविध शाळांनी देशभक्तीपर व सामाजिक विषयांवर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. उत्कृष्ट पोलीसपाटील, उत्कृष्ट बीएलओ , राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय खेळाडूंना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. उद्योगपती (स्व.) आर. के. पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मोनाली पाटील यांच्या सहकार्याने बक्षिसे देण्यात आली. लायन्स क्लब, रोटरी क्लब, पोलीसपाटील संघटना, मिलिंद नवसारीकर, येझदी भरुचा, डॉ. रवींद्र कुलकर्णी, डॉ. रवींद्र जैन, महेंद्र पाटील, नितीन विंचूरकर, अजय हिंदुजा, किशोर अहिरराव यांचे सहकार्य लाभले. संजय पाटील व सौ. वसुंधराताई लांडगे यांनी सूत्रसंचालन केले.

### या शाळांचा होता सहभाग

शासकीय सांस्कृतिक कार्यक्रमात ममता विद्यालय, इंदिरा गांधी विद्यालय, साने गुरुजी विद्या मंदिर, न्यू व्हिजन स्कूल, साने गुरुजी कन्या विद्यालय, के. डी. गायकवाड हायस्कूल, सरस्वती प्राथमिक विद्यालय, जी. एस. हायस्कूल, द्रौ. रा. कन्या शाळा, साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालय, लोकमान्य विद्यालय, पीबीए इंग्लिश स्कूल, रॉयल उर्दू हायस्कूल, आर्मी स्कूल आदी शाळांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

दरम्यान, यावेळी बालविवाह मुक्तीची शपथ घेण्यात आली. पोलिसांचे संचलन करण्यात आले. यावेळी नाना धनगर, पंकज साळी, नायब तहसीलदार सी. यू. पाटील, प्रशांत धमके, राजेंद्र ढोले, पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक भगवान शिरसाठ, पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज, नरेंद्र संदानशिव आदी उपस्थित होते.



अमळनेर : ममता विद्यालयात ध्वजवंदनप्रसंगी डॉ. मिलिंद वैद्य, गिरीश कुलकर्णी, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षिका.

### ॲड. ललिता पाटील स्कूल

येथील चोपडा रस्त्यावरील ॲड. ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सौ. ललितताई पाटील यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. संस्थेचे सचिव प्रा. श्याम पाटील, डॉ. प्रतिभा मराठे, प्राचार्य डॉ. निरज चव्हाण आदींसह विद्यार्थी व पालक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, कवायत संचलन व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी बक्षीस वितरणही झाले. दहावीचा विद्यार्थी मोहित पवार यास 'इयर ऑफ दी स्टूडंट' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बडींग सायंटिस्ट ऑफ दी इयर ॲवार्ड विज्ञान, गणित व समाजशास्त्र विषयातून तीन गटांना देण्यात आला. ॲड. सौ. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्य समन्वयक विलास पाटील व प्राथमिक विभागाच्या समन्वयिका श्रीमती मुस्कान डींगरे यांनी सुत्रसंचालन केले. आभार रवींद्र ठाकरे यांनी आभार मानले. हर्षला सोमवंशी यांनी परिश्रम घेतले.



अमळनेर : ॲड. ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये ध्वजवंदन करताना संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सौ. लालिताताई पाटील व मान्यवर.

### ममता विद्यालय

गलवाडे रस्त्यावरील मतिमंद विद्यार्थी शिक्षण मंडळाच्या ममता विद्यालयात ध्वजवंदन झाले. याप्रसंगी सहसचिव डॉ. मिलिंद वैद्य, सदस्य गिरीश कुलकर्णी यांची प्रमुख अतिथी होते. मुख्याध्यापक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. त्यानंर पालिका माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातही विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले.



अमळनेर : प्रांताधिकारी मयूर भंगाळे व पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना निवेदन देताना माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील. शेजारी आमदार अनिलदादा पाटील व विविध संघटनांच्या महिला पदाधिकारी.

# मुलींचा पळून विवाह करण्याच्या घटना चिंताजनक

## महिलांचे प्रशासनाला निवेदन; समुपदेशन, कायद्यांची अंमजबजावणीची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरासह तालुक्यात मुलींचे (वय १८ वर्ष) पळून विवाह करण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. तसेच महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर येथील सामाजिक कार्यकर्त्या, नगरसेविका व विविध संघटनांच्या महिलांनी प्रशासनास प्रजासत्ताकदिनी सोमवार, दि. २६ जानेवारी रोजी निवेदन दिले आहे. सुरक्षितता, समुपदेशन व प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, की कायद्याने सज्ञान महिलेला स्वतःचा जीवनसाथी निवडण्याचा अधिकार आहे. मात्र, अनेक प्रकरणांमध्ये भावनिक दबाव, फसवणूक, तात्पुरते आकर्षण, आर्थिक असुरक्षितता अथवा सुरक्षिततेचा अभाव अशा परिस्थितीत निर्णय घेतले जातात. त्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा घटनांचा परिणाम संबंधित महिलांच्या भवितव्यावर तसेच त्यांच्या कुटुंबांवरही गंभीर स्वरूपाचा होत आहे. भारतीय संविधानाच्या कलम २१ नुसार प्रत्येक व्यक्तीस जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाने लता सिंग विरुद्ध (उत्तर प्रदेश राज्य, २००६) या प्रकरणात सज्ञान व्यक्तीस विवाहाचा अधिकार मान्य केला आहे. मात्र, शफिन जहान विरुद्ध असोकन के. एम. (२०१८) व सोनी गेरी विरुद्ध (२०१८) या निकालांमध्ये अशा निर्णयांची स्वेच्छा, दबावमुक्तता व सुरक्षितता तपासण्याची जबाबदारी राज्य व प्रशासनावर असल्याचे स्पष्ट केले आहे. याशिवाय हिंदू विवाह अधिनियम, १९५५ मधील कलम ५ (३) तसेच भारतीय दंड संहिता कलम ३६६ नुसार विवाहासाठी जबरदस्ती, फसवणूक अथवा दबाव टाकणे हा दंडनीय गुन्हा आहे. या पार्श्वभूमीवर विवाह नोंदणीपूर्वी सज्ञान मुलीची स्वेच्छा, मानसिक स्थिती व सुरक्षिततेची अधिकृत पडताळणी करणे, शक्य असल्यास पालकांना समुपदेशनासाठी बोलावून मध्यस्थी प्रक्रिया राबविणे, महिला व बाल विकास विभाग किंवा संरक्षण अधिकाऱ्यांमार्फत समुपदेशन अहवाल अनिवार्य करणे, तसेच दबाव किंवा फसवणूक आढळल्यास तात्काळ कायदेशीर कारवाई करणे, अशा घटनांना आळा घालण्यासाठी विवाह नोंदणी कार्यालये व स्थानिक प्रशासनासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे व प्रतिबंधात्मक सूचना जारी करण्याची गरज असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील, सौ. तिलोत्तमाताई पाटील, शोभाबाई गढरे, सौ. वसुंधराताई लांडगे, सौ. स्वप्ना पाटील, भारती पाटील, नंदा संदानशिव, सौ. रीता बाविस्कर, अफसाना खाटीक, कविता राजपूत आदींच्या सह्या आहेत.

# शेतकऱ्यांचा अत्यल्प प्रतिसाद; ५९ हजार पीक प्लॉट पाहणी प्रलंबित

पान १ वरून

उद्देश आहे. शेतकऱ्यांसाठी केंद्र शासनाची ॲग्रीस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. या योजनेनंतर्गत राज्यातील शेतकरी माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), हंगामी पिकांचा माहिती संच व शेतांचे भू-संदर्भीकृत (जिओ रेफरन्स लँड पार्सल) यांचा माहिती संच असे तीन पायाभूत माहिती संच तयार होणार आहेत. यासाठी हंगामी पिकांचा माहिती संच अंतर्गत पीक पाहणीसाठी डिजिटल क्रॉप सर्व्हे राबवण्यात येत आहे. 'डिसीएस' या मोबाईल ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्याद्वारे प्रथम याचा वापर करण्यात येतो. त्यानंतर नंतर तलाठी त्यांच्या गावात तहसीलरांकडून नेमलेल्या सहाय्यकांच्या माध्यमातून उर्वरित पीक पाहणी पूर्ण करणार आहेत. शेतकऱ्यांचा पीक पाहणीत निरूत्साह दिसून आल्याने, महसूल अधिकारीच आता सहायकांच्या मदतीने ही पीक पाहणी पूर्ण करणार आहे. यासाठी मोबाईलचे ज्ञान असलेले तरुणही सहायक म्हणून काम करू शकणार आहेत.



### शोक सांत्वना बैठक



बताते हुए अत्यंत दुःख होता है कि बजरंगलाल, दीपचंद, घनश्याम इनकी पूजनीय बड़ी बहन श्रीमती कमलाबाई फूलचंदजी ककरानीया का देवलोकगमन दिनांक २४ जनवरी २०२६ के दिन अमरावती में हुआ। इसकी शोक सांत्वना बैठक रखी है।

**तारीख :** २८/०१/२०२६
**कल बुधवार**
**समय :** ४:०० से ६:००
**स्थल :** बंसीलाल पैलेस अमलनेर

**शोकाकूल**
शंभूलाल अग्रवाल
बजरंगलाल अग्रवाल
एवं समस्त अग्रवाल
परिवार अमलनेर

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हाऊस पारोला रोड, धुळे




# भोजनाचा मनावर काय परिणाम होतो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण तीन महिन्यांसाठी एक प्रयोग करून बघा. सात्त्विक अन्न खाण्यामुळे आपल्यात एक प्रकारचा बदल दिसून येतो. कारण जसे अन्न, तसे मन होते. सात्त्विक अन्न हे फक्त शाकाहारी नाही, तर ते ईश्वराचे स्मरण करून बनवलेले अन्न असते. जर आपण रागाच्या भरात स्वयंपाक केला असेल, तर त्यास सात्त्विक अन्न म्हणत नाहीत. म्हणून स्वयंपाक करणाऱ्याने कधीही रागाच्या भरात, उदास, नाराज होऊन स्वयंपाक करू नये. (जेवण बनवू नये. अन्न शिजवू नये.) तसेच स्वयंपाक करत असताना कधीही आईला, बहिणीला, पत्नीला (जे कोणी स्वयंपाक करत असतील त्यांना) ओरडू नये, रागावू नये, त्यांच्याशी भांडू नये. कारण त्या स्थितीत त्या स्वयंपाकघरामध्ये जाऊन स्वयंपाक करत असताना त्या पदार्थांत त्याच प्रकारची (सर्व रागाची) स्पंदने जातात आणि तेच आपण खाणार असतो. ही लक्षात ठेवण्याची महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. म्हणूनच पूर्वी सोवळे नेसून स्वयंपाक करण्याची पद्धत होती.

### भोजनाचे तीन प्रकार

१) जे आपण हॉटेलमध्ये खातो
२) जे घरात आई, पत्नी बनविते
३) जे आपण मंदिरातील अन्नकुटात खातो ते भोजन

तिन्ही भोजनांत वेगवेगळी स्पंदने असतात.

१) हॉटेलमध्ये पदार्थ बनवितात ते विकत घेऊन खावे लागते. ते आपण नेहमी खाल्ल्यास त्यातील स्पंदने आपणास आंतरिक समाधान देत नाहीत. त्यामुळे कधी-कधी त्या अन्नाने आपणास त्रासही होतो. ते पदार्थ कोण शिजविते, त्यावेळी त्याच्या मनात काय चालले आहे, त्याचा भाव कोणता आहे, ते सगळे त्या अन्नात उतरते, तेच संस्कार त्या अन्नावर होतात. तोच भाव आपल्यात उतरतो.

२) घरात आई, पत्नी जे पदार्थ करते ती फार प्रेमाने करत असते. म्हणून त्या पदार्थांत सात्त्विक स्पंदने असतात. ती आपणास समाधानी बनवितात. परंतु हल्ली अनेक घरांत स्वयंपाकी ठेवले जातात. त्यांच्या मनातील विचार आपणास सुख देत नाहीत. घरात मुलगा जेवत असेल आणि आपल्या आईला म्हणत असेल, की मला आणखी एक पोळी वाढ. तेव्हा आईचा चेहरा आनंदाने फुलून येतो. ती आणखी प्रेमाने एक पोळी त्याला वाढते. त्यात तिचे प्रेम असते, आनंद असतो. पण हेच आपण स्वयंपाक्याकडे मागितले, तर तो वाढेल; पण त्यात प्रेम असेलच असे नाही. असे जेवण अंगी लागत नाही.

३) मंदिरातील अन्नकुटात आपण जे खातो ते भगवंतास दाखविलेला प्रसाद असतो. ती भावना प्रसादाची असते. ते अन्न ईश्वराला स्मरण करून शिजविलेले असते म्हणून ते अन्न प्रसाद होते.

आपणही रोज घरात ईश्वरासाठी भोजन बनवत आहोत, असे समजून त्याच्या स्मरणात अन्न शिजवावे म्हणजे तो प्रसाद होईल. यासाठी आपले स्वयंपाकघर स्वच्छ ठेवा, मन शांत ठेवा, देवाचे भजन किंवा गीत लावा किंवा नामस्मरण करत स्वयंपाक करा म्हणजे रोज प्रसादच भक्षण होईल. स्वयंपाक करताना अनेक उपायही करता येतात. घरात काही त्रास असेल, तर त्यावर हा एक उपाय आहे. ती गोष्ट चांगली व्हावी म्हणून परमेश्वराकडे प्रार्थना करत स्वयंपाक करावा. परमेश्वरास प्रार्थना करावी, की हे अन्न खाणाऱ्यांच्या मनात एकमेकांविषयी प्रेम, वात्सल्य, आपुलकी, विश्वास निर्माण होऊ दे. त्यांच्या मनात शांती निर्माण होऊन सकारात्मकता, तुझ्याविषयी श्रद्धा निर्माण होऊ दे, अशी प्रार्थना अन्न शिजविताना मनातल्या मनात म्हणत जा.

अन्नात जादू आहे आणि त्यावर स्वयंपाक करताना होणाऱ्या संस्कारांचाही परिणाम होतो. स्वयंपाक करणाऱ्याच्या मानसिक भावभावनांच्या संस्कारांचा त्याच्यावर विलक्षण परिणाम होतो. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे भाजी असो, कुकर असो, काहीही असो, त्या पात्राला हात लावून कृष्णार्पणमस्तु किंवा शिवार्पणमस्तु म्हणून नमस्कार करा. मग बघा, काय जादू होते. सगळी आसपासची सूक्ष्म स्पंदने संपून जातील आणि उरेल किंवा तयार होईल प्रसाद.

# चिंतेविना कोणीही नाही!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


चिंतेमधून अर्थात टेन्शनमधून बाहेर कसे पडू, हे पाहण्यापेक्षा आपण त्याचाच अधिक विचार करतो. त्यामुळे चिंता कमी होण्याऐवजी वाढतच जाते. म्हणून चिंता कमी करण्यासाठी काय उपाय करता येतील, हे पाहणे खूप महत्त्वाचे आहे. चिंता कमी करण्यासाठी आपल्याकडे एक सोपा मार्ग आहे तो म्हणजे श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग. त्यामुळे जास्तीत जास्त श्री स्वामी समर्थ महाराजांची सेवा करून चिंतेमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करा.

आजच्या धकाधकीच्या जीवनात स्वामी सेवा खूप महत्त्वाची आहे. आपले नेमके आपले येथेच चुकते. त्यामुळे न चुकता रोज स्वामींच्या नित्य सेवेत राहा. आपली चिंता कधी संपेल हे आपल्याच लक्षात येणार नाही. त्यासाठी नित्य राहा स्वामींच्या सेवेत मनापासून.

# रुद्रांक्षांचे विविध प्रकार व त्यांचे महत्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शिवभक्तांपैकी प्रत्येकाला ज्याचं प्रचंड आकर्षण आहे असा एकमेवाद्वितीय रुद्राक्ष म्हणजे 'एकमुखी रुद्राक्ष', एकमुखी रुद्राक्ष हा शिवभक्तांचा प्राण समजला जातो. प्रत्येक श्रध्दावान शिवभक्तांकडे एकमुखी रुद्राक्ष असावा असं त्यांना मनापासून वाटते. अस्सल नेपाळी एकमुखी रुद्राक्ष हा प्रचंड दुर्मिळ असल्याने व जवळपास अप्राप्य असल्याने त्याला पर्याय म्हणून पण तितकाच प्रभावी, असा इंडोनेशियन रुद्राक्ष प्रचलित आहे. नेपाळी एकमुखी रुद्राक्ष हा मध्यम आकाराचा, गोल व अतिशय सुबक असतो. त्याचे दर्शनही दुर्मिळ असते. पशुपतीनाथ मंदिरात अस्सल नेपाळी एकमुखी रुद्राक्ष पूजेत आहे. सध्या रुद्राक्षांमधील डुप्लिकेशन, लबाड्या यांचा विचार करता मी स्वतः कुणालाही नेपाळी एकमुखी रुद्राक्षांच्या हट्टापासून परावृत्त करतो. तिनमुखी गोल रुद्राक्ष घेऊन अत्यंत सफाईदारपणे त्याची दोन मुखे बुजवून त्यांना एकमुखी म्हणून बाजारात आणण्याचे प्रकार केले जातात. एकमुखी रुद्राक्षावर क्वचितप्रसंगी शिवलिंग, नंदी, ॐ, त्रिशुल अशी शुभचिन्हे अंकित असतात अशी किंवदंती आहे.ड्युप्लिकेट रुद्राक्षांवर या प्रतिमा कोरण्याचे प्रकारही मी बघितले आहेत. माझ्या पुजेतील इंडोनेशिअन एकमुखी रुद्राक्षावर एक अस्सल शिवलिंग प्रतिमा आहे (अर्थात प्रत्येक रुद्राक्षावर ती असतेच असे नाही) शिवभक्तांनी इंडोनेशिअन एकमुखी रुद्राक्ष धारण करणे केव्हाही उत्तम. इंडोनेशिअन एकमुखी रुद्राक्ष हा काजू किंवा संत्र्याच्या फोडीच्या आकाराचा, पांढरट पिवळसर ते लालसर काळ्या रंगात उपलब्ध्द असतो. तो अतिशय रेखीव, सुबक व देखणा असतो. त्याचेच पेंडट बनवून आम्ही देतो.



एकमुखी रुद्राक्ष हा प्रामुख्याने दारिद्र्यनाशक, क्लेशनाशक आणि लक्ष्मीकारक म्हणून प्रचलित आहे. तो अत्यंत पवित्र, श्रेष्ठ व दैदिप्यमान असतो. एकमुखी रुद्राक्षातून प्रस्फुरित होणारी स्पंदने व लहरी या अतिशय तीव्र स्वरुपाच्या असून आध्यात्मिक प्रगती करणाऱ्या, धारणकर्त्याच्या मनात शुभत्व निर्माण करणाऱ्या, पवित्र असतात, त्यामुळे संस्कारीत एकमुखी रुद्राक्ष धारण करणाऱ्या व्यक्तिच्या आसपास वाईट व अशुभ शक्ती चूकुनही फिरकत नाहीत किंवा अशा अशुभ स्पंदनांचा त्रास त्यांना होत नाही. एकमुखी रुद्राक्ष धारण करणाऱ्या व्यक्तिच्या शुभप्रभावाने त्याचा शत्रुपक्ष कमकुवत होतो, शत्रुत्वाची धार कमी होते व एकेदिवशी मनुष्य अजातशत्रु बनतो असा अनुभव अनेकांना आला आहे, त्यामुळे ज्यांना तीव्र व्यावसायिक व वैयक्तिक शत्रुत्वाचा त्रास आहे, स्पर्धक बलवान आहेत अशांना मी एकमुखी रुद्राक्ष वापरण्याचा सल्ला आवर्जुन देतो. आम्ही एकमुखी रुद्राक्षावर एका विशिष्ट पध्दतीने शंकराच्या दारिद्र्यदहनत्वाचे संस्कार करत असल्याने एकमुखी रुद्राक्षामधील मुळात असलेली दारिद्र्यनाशशक्ती खुप वाढते, व्यक्ती कर्जमुक्त व्हायला सुरुवात होते, धनप्राप्तीचे अनेक मार्ग मोकळे व्हायला लागतात, येणी असल्यास ती वसुल व्हायला सुरुवात होते. पैसा अवास्तव खर्च होत असेल तर त्यालाही आळा बसतोनोकरी व्यावसायातील आर्थिक उत्पन्न वाढीस लागते. धनसंचय व्हायला लागतो. असे असंख्य शब्दातीत फायदे व लाभ एकमुखी रुद्राक्षधारणाने व्हायला लागतात.

एकमुखी रुद्राक्षाचे पेंडट गळ्यातून काढून उजव्या मुठीत ठेवून पंधरा मिनिटे नुसता ॐ नमः शिवाय असा मंत्रजप केला तरी मानसिक तणावातुन मुक्तता मिळते असा माझ्या अनेक क्लायंट्सचा रोकडा अनुभव आहे. ज्वरविकार, क्षय, विषमज्वर, त्वचारोग यासाठी एकमुखी रुद्राक्ष जर चांदीच्या किंवा स्वच्छ तांब्याच्या भांड्यात पाणी ठेवून त्यात रात्रभर बुडवून ठेवून ते पाणी सकाळी (रुद्राक्ष बाजुला काढून, गाळून मग) रोग्याला पाजल्यास बऱ्याच अंशी लाभ होतो. रक्तदाब, क्षय, अपस्मार (फीट्स), दुर्धर त्वचाविकार, स्मरणशक्ती कमी असणाऱ्यांनी, अशक्त मनुष्यांनी जर सिध्द एकमुखी रुद्राक्षाचे पेंडट गळ्यात धारण केले तर खुप फायदा होतो. एकमुखी रुद्राक्ष हा अतिशय पवित्र व कल्पवृक्षासमान असल्याने त्याच्या धारणानंतर परस्त्रीगमन, मद्यपान व जुगार या गोष्टींपासून लांब रहावे लागते (हा नियम कटाक्षाने पाळावाच लागतो), मांसाहार करताना एकमुखी रुद्राक्ष किमान गळ्यात तरी नसावा ही विनंती. आम्ही एकमुखी रुद्राक्ष हा शिवयामल तंत्रातील काही गुढ मंत्र व मानसशक्तींनी सिध्द करुन देत असतो, त्यामुळे अस्सल सर्टिफाईड रुद्राक्ष मिळवून त्यावरील संस्कार यासाठी किमान महिनाभराचा अवधी लागतो हे साधकांनी ध्यानात घ्यावे. सध्या माझ्याकडे काही उत्तम एकमुखी रुद्राक्ष उपलब्ध असल्याने ज्यांना एकमुखी रुद्राक्ष धारणात रस आहे अशांनी त्वरित संपर्क साधावा ही विनंती.

### पाचमुखी रुद्राक्ष

अत्यंत सुपरिचित असा हा रुद्राक्षांतील पंचमुखी (पाचमुखी रुद्राक्ष) आहे. हा तसा खुपच स्वस्त, सर्वत्र उपलब्ध्द आणि परिचित आहे. रुद्राक्षवृक्षाला तुलनेत सर्वाधिक रुद्राक्ष हे पाचमुखीच जास्त येतात. पाचमुखी रुद्राक्षाला "कालाग्नी" ही संज्ञा आहे. पंचमुखी शिवाशी याचा संबंध जोडला जातो.शरिरातील पाच तत्वे, पंचज्ञानेंद्रिये यावर हा रुद्राक्ष जबरदस्त शुभ काम करतो. पंचमुखी रुद्राक्ष सातत्याने प्रदीर्घकाळपर्यंत धारण केल्यास मनःशांती मिळते, मन व बुध्दी स्थिर होते. नाक,कान व घशाचे विकार कमी व्हायला मदत मिळते, रक्तदाबही संतुलित रहातो असे अनेक फायदे या पंचमुखी रुद्राक्ष धारणाने होतात. विशिष्ट मंत्रांनी हा रुद्राक्ष सिध्द करुन वास्तुत ठेवला तरी वास्तुतील जुनाट दोष, मालिन्य व क्लेश कमी व्हायला मदत होते. पंचमुखी रुद्राक्ष गळ्यात धारण केल्यावर मनुष्यातील विवेकशक्ति जागृत होते, वाईट शक्ति, बाधा यापासुन संरक्षण होते. वाहन, वास्तु, शरीर अशा कोणत्याही ठिकाणी जेव्हा हा पंचमुखी रुद्राक्ष असतो तेव्हा त्या क्षेत्रातील बहुसंख्य दोष कमी होऊन ती जागा संरक्षित केली जाते असा अनुभव आहे. अल्पमोली आणि बहुगुणी असा हा पंचमुखी रुद्राक्ष मानला जातो.

### नऊमुखी रुद्राक्ष

नवदुर्गेच्या नवविध रुपांचे प्रतिक असलेला नऊमुखी रुद्राक्ष हा एक श्रेष्ठतम रुद्राक्ष मानला जातो. धैर्य, उच्चपदाधिकार, यशस्विता, धनसंपत्ती व सर्वांगिण लाभासाठी नऊमुखी रुद्राक्ष दिला जातो.शत्रुपीडानाश, आरोग्यप्राप्ती, आयुष्यात मंगलकारक घटना घडणे, आत्मविश्वास येणे, धाडस व धैर्याची प्राप्ती होणे असे अनेक गुणधर्म या रुद्राक्षात आहेत. वैवाहिक जीवनातील गैरसमज दूर होतात, असाही अनेकांचा अनुभव आहे. नऊमुखी रुद्राक्ष धारणानंतर पतीपत्निमधील संबंध सुधारतात, दुरावा कमी होतो. नऊमुखी रुद्राक्ष हा आरोग्यशास्त्रानुसार मस्तकविकार, स्त्रीयांचे मासिक पाळीचे विकार, पित्तविकार, डोकेदुखी यासाठीही एक जोड-उपचारपध्दती म्हणून शरीरावर धारण करण्याची पद्धत आहे.

**॥ प्रथमं शैलपुत्रीश्च द्वितियं ब्रह्मचारिणी ।**
**तृतियं चंद्रघंटेती कुष्मांडेती चतुर्थकम् ॥**
**पंचमं स्कन्दमातेती षष्ठं कात्यायनिती च ।**
**सप्तमं कालरात्रिश्च महागौरीती चाष्टमम् ॥**
**नवमं सिद्धिदात्री च नवदूर्गा प्रकिर्तितः ।**

रुद्रतंत्रासोबत या मंत्राचे संस्कार करुन जर नऊमुखी रुद्राक्ष शरीरावर धारण केला तर त्याचे अतिशय छान अनुभव येतात. आयुष्यात विजय प्राप्त होणे, मंगलकारक घटना घडणे, विशुध्द आध्यात्मिक अनुभव येणे, पैशाची बाजू सुधारणे, बचतीचे प्रमाण वाढणे, शत्रुपीडांची तीव्रता नष्ट होणे अशा दिव्य अनुभवांसाठी हा नऊमुखी रुद्राक्ष धारण करावा.

### चारमुखी रुद्राक्ष

चारमुखी रुद्राक्ष हा रुद्राक्षांतील 'ब्रह्मदेव' मानला जातो. चतुर्मुख ब्रह्मदेवांचे प्रतिक असलेला हा रुद्राक्ष अतिशय पवित्र असतो. या रुद्राक्ष चार पुरुषार्थांचे म्हणजे धर्म, अर्थ, काम आणि मोक्षाचेही प्रतिक आहे. यशप्राप्तीसाठी हा रुद्राक्ष अनमोल आहे. ज्या व्यक्ति सेल्स-मार्केटिंग क्षेत्रात काम करतात अशांना हा रुद्राक्ष वरदानस्वरुप असतो. हा चार दिशांवर काम करत असल्याने प्रगतीचे अनेक मार्ग खुले होतात. येणाऱ्या ऑर्डर्समध्ये वाढ होते असा अनुभव अनेकांना आहे. ब्रह्मदेव हा सृष्टीचा निर्माता असल्याने विशेषतः संततीप्राप्तीसंदर्भात काही अडचणी असतील तर त्यांची तीव्रता कमी होते व संततीप्राप्तिचे मार्ग सुलभ होतात असा अनेकांचा अनुभव आहे. जी मंडळी सातत्याने बुध्दीसंदर्भात क्षेत्रात काम करतात, शिक्षकवर्ग-वकील-सीए- फायनान्स कन्सल्टंट्स- सरकारी उच्चपदस्थ अधिकारी वगैरेंना या रुद्राक्षाचे खुप लाभ होतात.

### अकरामुखी रुद्राक्ष

अकरामुखी रुद्राक्ष म्हणजे शिवभक्तांचा प्राण मानला जातो. वीरभद्र, शंभु, गिरीश, अजैकपाद, अहिर्बुध्न्य, पिनाकी, अपराजित,भुवनाधिश्वर, कपाली, स्थाणू आणि भव हे अकरा रुद्र मानले जातात. अकरा ही संख्या पवित्र मानली जाते. अंकशास्त्रातील ११ हा आकडा शुभ मानतात. पहिली समरुप (दोन्ही एकक अंक समान असलेली संख्या) म्हणजे अकरा हीच आहे. अकरामुखी किंवा एकादशमुखी रुद्राक्ष हा साक्षात रुद्ररुप असल्याने संकटांचा समुळ नाश करुन धारणकर्त्याला सर्व प्रकारची सुरक्षितता व सुयश देणारा असा मानला जातो. अकालमृत्युहरण, सर्वकामदाफलदायक अशा अनेक संज्ञा या रुद्राक्षाला दिल्या आहेत. माझ्या परिचयातील एका अतिशय श्रीमंत कुटुंबात (या कुटुंबातील मागच्या तिन्ही पिढ्या रुढार्थाने श्रीमंत व प्रत्येक व्यक्ती दीर्घायुष्यसंपन्न आहे) एका ऋषीने दिलेला एकादशमुखी रुद्राक्ष पूजेत ठेवलेला आहे. कोणत्याही महत्वाच्या प्रसंगी या रुद्राक्षाचे विधीवत पूजन केले जाते. घराण्यातील संपत्ती व दीर्घायुष्याचं श्रेय त्या मंडळींनी या रुद्राक्षालाच दिले आहे. अकरामुखी रुद्राक्ष हा उद्योगशीलता, कार्यप्रवणता, श्रेष्ठत्व, सुयश प्रदान करणारा आहे. प्रचंड धनसंपत्तीप्राप्त झाल्यानंतर व्यक्तिला एकप्रकारची शांतता व तृप्तता लाभायला हवी (खरं म्हणजे तसं होत नाही. व्यक्ति अधिक धावपळ करत अजुन पैशाच्या मागे लागते) ती या रुद्राक्षाने मिळते. संपत्तीचे तेज, स्थैर्य, यशाच्या अत्युच्च शिखरावर पोहोचल्यानंतरच्या विजयाचा आनंद या रुद्राक्षधारणानंतर मिळतो हे नक्की. आरोग्यशास्त्रानुसार वजन कमी असणे, रोगटपणा, आळस, अतिनिद्रा, शरिराची वाढ न होणे, वाढ खुंटणे, दमा, श्वसनविकार यासाठी हा रुद्राक्ष धारण केला जातो. या रुद्राक्षधारणाने व्यक्तिला एकप्रकारचे तेजतत्व प्राप्त होते.

### दोनमुखी रुद्राक्ष

दोनमुखी रुद्राक्षाला शिवपार्वतीस्वरुप मानले जाते. ज्या जोडप्यांना किंवा व्यक्तिंना गौरीशंकर रुद्राक्ष घेणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही अशांना दोनमुखी रुद्राक्ष दिला जातो. शरीरात जे अवयव समांतर किंवा दुहेरी आहेत अशा अवयवांच्या विकारांवर म्हणजे कान, डोळे, हात-पाय यांच्या विकारांवर दोनमुखी रुद्राक्ष अतिशय प्रभावी उपचार म्हणून धारण केला जातो. दोनमुखी रुद्राक्ष हा समृध्दीकारक, यशकारक व प्रभावी असतो. एकापेक्षा अनेक उत्पन्नाचे मार्ग उपलब्ध्द करणे, यश, आध्यात्मिक प्रगती, लाभ, योगसाधनेत प्रगती, मनःशांती यासाठी दोनमुखी रुद्राक्ष काम करतो. शिव आणि शक्ति उपासनेत या रुद्राक्ष धारणेने प्रगती होते. वृषभ व कर्क राशीसाठी हा रुद्राक्ष लाभदायक असतो....

### सातमुखी रुद्राक्ष

सातमुखी रुद्राक्षापासून हळूहळू रुद्राक्षाच्या किंमतीत वाढ व्हायला सुरूवात होते. सात हा आकडा ज्योतिषशास्त्रातील नेपच्युन ग्रहाशी संबंधित असुन सप्तरंग, सप्तमातृका, सप्तस्वर यांचेही प्रतीक आहे. सातमुखी रुद्राक्ष हा स्वभावातील 'आनंद' या गुणांशी संबंधित आहे असे माझे संशोधन आहे. सातमुखी रुद्राक्ष धारण केल्यानंतर व्यक्तिमधील निराशा, मरगळ व निरुत्साह संपून एक नवे आनंदपर्व सुरू होते, असा अनुभव व निरिक्षण आहे. सातमुखी रुद्राक्षधारणानंतर विनम्रता,औदार्य,क्षमाशीलता,परिश्रम,दया,संयम व पवित्रता या सात सद्गुणांचाही व्यक्तीमध्ये समावेश व्हायला लागतो. एकंदरीत दुभंग व निराश व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल व्हायला सुरुवात होते. अतिशय गुढ पण छान अनुभव यायला लागतात, ध्यानधारणेतही मनासारखी प्रगती व्हायला सुरूवात होते.

रुद्राक्ष हा मनावर व शरिरावर एकत्रित परीणाम करतो. सातमुखी रुद्राक्ष हा श्रीलक्ष्मीनारायणांचे प्रतिक मानला जात असल्याने अचल धनसंपत्ती, सुयश, व्यावसायिक यश व सुस्थिरता, पैशाचा अपव्यय थांबणे, येणी वसुल होणे, धंदा-नोकरीसाठी अत्यावश्यक असणारे ज्ञान संपादन करणे, व्यवहारचातुर्य अशा कितीतरी गुणांचा परिपाक व्यक्तिच्या व्यक्तिमत्वात व्हायला सुरुवात होते. संधीवात, हाडांची जुनाट दुखणी, वातविकार यावरही हा रुद्राक्ष उत्तम परिणामकारक ठरतो. शरिरातील 'रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा आणि शुक्र' या सप्तधातूंवरही हा रुद्राक्ष शुभपरिणाम करत असल्याने एकंदरीत फिजिकल मेटाबोलिझम सुधारायला निश्चितच मदत होते.

असा हा बहुगुणी सातमुखी रुद्राक्ष आहे.

### बारामुखी रुद्राक्ष

धातू, मित्र, अर्यमन, रुद्र, वरुण, सूर्य, भग, विवस्वत, पुषन, सवितृ, त्वष्टा आणि विष्णू ही सूर्याची बारा नावे आहेत. अशा बारा सूर्यांचे तेज ज्याच्यात एकवटले आहे असा बारामुखी रुद्राक्ष हा रुद्राक्षांमधील तेजतत्वाचे, विजयाचे आणि अखंड यशाचे प्रतिक मानला जातो. बारामुखी रुद्राक्ष धारण करणाऱ्याचे तेज प्रबळ बनून त्याचा समोरच्या व्यक्तिवर अत्यंत सकारात्मक प्रभाव पडतो. सूर्य ज्याप्रमाणे पृथ्वीतलावर समग्र जीवसृष्टीचे भरणपोषण करतो त्याप्रमाणे या व्यक्ति इतरांना सहाय्यक होतात व स्वतःच्या सर्व जबाबदऱ्या यशस्वीपणे पार पाडतात असा अनुभव आहे. हा श्रेष्ठ असा बारामुखी रुद्राक्ष प्रेरणादायक, ध्येयनिष्ठा प्रदान करणारा, धाडस देणारा,आत्मविश्वास व नेतृत्वगुण प्रदान करणारा आहे. व्यापार, देणेघेण्याचे व्यवहार असणारी मंडळी, रिटेल ट्रेडर्स, ट्रान्स्पोर्टर्स यांना हा रुद्राक्ष अतिशय लाभदायक ठरतो. समाजात मानसन्मान, प्रतिष्ठा प्राप्त होते. धनसंपत्तीचे लाभ होतात.

### दहामुखी रुद्राक्ष

दहामुखी रुद्राक्ष हा साक्षात भगवान श्रीविष्णूंचे प्रतीक मानला जातो. भगवान श्रीविष्णूंच्या श्रेष्ठत्व, कौशल्य, शौर्य, सौंदर्य, श्रीमंती व स्थैर्य या गुणांचा समुच्चय हा दहामुखी रुद्राक्षाच्या ठायी असल्याने दहामुखी रुद्राक्ष धारण करणारी व्यक्ति साक्षात श्रीविष्णूस्वरुपच बनते. दहामुखी रुद्राक्षधारणानंतर व्यक्तिंच्या आयुष्यातील ससेहोलपट कमी होऊन जीवनाला एकप्रकारची सुस्थिरता व शांतता लाभते असा अनुभव आहे. परिस्थितीशी झगडा कमी होतो.

॥ श्रीर्वर्चस्वमायुष्यमारोग्यमाभिधाच्छोभमानं महीयते।
धान्य धनं पशु बहु पुत्रलाभम् सत्संवत्सरं दीर्घमायुः॥

दहामुखी रुद्राक्ष धारणाने अचल संपत्ती, मानसन्मान, आयुरारोग्य, सौंदर्य, धान्य, धन, पशु, संतती आणि दीर्घायुष्य या गोष्टींची प्राप्ती व्हायला मदत होते. अनेक उद्योगव्यवसाय करुनही ज्यांना सतत अपयशांचा सामना करावा लागतो, पदरी हार व निराशा येते अशांना उद्योगशीलतेसोबत यशप्राप्तीसाठी हा दहामुखी रुद्राक्ष अतीव सहाय्यक ठरतो असा अनुभव आहे. तो श्रीविष्णूंचे प्रतिक मानला गेलेला असल्यामुळे "जिथे श्रीविष्णू तिथे श्रीलक्ष्मी" या उक्तिनुसार आलेल्या धनसंपत्तीची चंचलता होऊन पैसा स्थिर होऊन टिकायला व पैशाची बचत किंवा नियोजन व्हायला अतिशय मदत होते. घरातील अनावश्यक खर्च कमी होतात. असा हा अतिशय दिव्य आणि कामधेनुस्वरुप दहामुखी रुद्राक्ष खुपच श्रेष्ठ व पवित्र मानला जातो.

### सहामुखी रुद्राक्ष

रुद्राक्षांमधील सहामुखी रुद्राक्ष देखील अल्पमोली पण अतिशय बलवान व श्रेष्ठ रुद्राक्ष मानला जातो. सहामुखी रुद्राक्ष हा श्रीशिवपुत्र, गणेशभ्राता कार्तिकेय/कार्तिकस्वामींचे प्रतिक मानला जातो. ज्योतिषशास्त्रातील षष्ठस्थान (शत्रुस्थान) हे जेव्हा बिघडलेले असते तेव्हा संबंधित मनुष्याला गुप्तशत्रुंच्या कारवाया, पीडा यांचा जबरदस्त त्रास सहन करावा लागतो,॥ शत्रुबुध्दी विनाशाय ॥ ही उक्ति सहामुखी रुद्राक्षाला अगदी यथार्थपणे लागू होते असं म्हणायला हरकत नाही.

सहामुखी रुद्राक्षधारणानंतर शत्रुंच्या प्रकट व गुप्त कारवाया कमी व्हायला मदत होते. शत्रु नामोहरम व्हायला लागतात. कार्तिकेय ही देवता म्हणजे परमेश्वरी-ईश्वरी सेनेचे सेनापती मानले जातात. अत्यंत बुध्दीमान, चाणाक्ष व जबरदस्त पराक्रमी असे हे दैवत आहे. त्यामुळे सहामुखी रुद्राक्षधारणानंतर हळूहळू व्यवहारज्ञान, चाणाक्षपणा, धोरणीपणा, शौर्य, धाडस व पराक्रम या गुणांचा समुच्चय धारणकर्त्याच्या स्वभावात व्हायला लागतो असा अनुभव आहे. सहामुखी रुद्राक्ष हा व्यक्तिला धाडस, सभाधीटपणा, शौर्य, उत्साह प्रदान करतो.

काम, क्रोध,मद, मोह, लोभ आणि मत्सर हे षडरिपु म्हणून ओळखले जातात. जेव्हा यातील अनेकांचा किंवा एकाचा अतिरेक होतो तेव्हा मानवी स्वभावात खुप मोठे संलग्न दुर्गुण निर्माण व्हायला लागतात, त्यामुळे वैयक्तिक त्याची व समाजाची अधोगती व्हायला सुरुवात होते. या षडरिपुंना संयमित करण्याचे व त्यांच्यावर अंकुश ठेवण्याचे कार्य सहामुखी रुद्राक्ष करतो. कार्तिकेय ही देवता बुध्दीची देवता मानली जाते. त्यांना विद्यावाचस्पती म्हणतात. त्यामुळे सहामुखी रुद्राक्ष हा विद्यार्थीवर्गालाही अतिशय लाभदायक असतो. स्मरणशक्ति वाढविणे, केलेला अभ्यास लक्षात रहाणे, उत्तम आउटपूट देणे, संभाषणकौशल्य यासाठी सहामुखी रुद्राक्ष हा शिवतंत्रातील एक रामबाण उपाय आहे.

कार्तिकेय/कार्तिकस्वामीचे स्त्रीवर्गाशी पटत नसल्याने किंवा तसा पौराणिक संदर्भ असल्याने वैयक्तिक मी स्वतः शक्यतो विवाहित स्त्रीला सहामुखी रुद्राक्ष धारण करावयास सुचवत नाही/देत नाही. मात्र विद्यार्थिनींना हा रुद्राक्ष धारण करावयास कोणतीही हरकत नाही. त्यामुळे लाभच झाल्याची असंख्य उदाहरणे आहेत.

### आठमुखी रुद्राक्ष

आठ हा आकडा अंकशास्त्रानुसार शनिच्या अंमलाखाली येतो. आठ या अंकातच धीरोदात्तपणा, चाणाक्षपणा, दूरगामी विचार करुन योजना आखण्याचा संकल्प, प्रदीर्घकाळपर्यंत झगडण्याची इच्छाशक्ती या अनेक उत्तम गोष्टी येतात. तसाच आठमुखी रुद्राक्ष हा विघ्नहर्त्या श्रीगणेशाचे प्रतीक मानले जाते, त्यामुळे बुध्दीचा विकास होणे, स्मरणशक्तित वाढ होणे, ज्ञानसाधनेतील अडथळे दूर होणे, शिक्षण पूर्ण होणे यासाठी धारण करण्याची पध्दत आहे. आठमुखी रुद्राक्ष हा गणेशाबरोबरच अष्टदिशा, अष्टदिक्पाल, अष्टविनायकांचे प्रतिक मानला जातो.

अनेक जुन्या जाणकारांच्या मते आठमुखी रुद्राक्षाचा संबंध पत्रिकेतील आत्यंत वाईट व नकारात्मक मानल्या गेलेल्या अष्टमस्थानाशी असल्याने अकालमृत्युसंबंधातील दोषनिवारण होणे, आयुष्यवर्धन होणे, पत्रिकेतील वाईट स्थानांच्या दशांचे दुष्परिणाम कमी होणे यासाठीही आहे. ज्या व्यक्तिंना स्वतःच्या अकाली मृत्युचे भय सतत वाटत असते अशांनी हा रुद्राक्ष अवश्य धारण करावा, जेणेकरुन ते भय कमी होऊन सकारात्मक विचार येतात. आठमुखी रुद्राक्षामुळे वातावरणातील विचित्र, अनाकलनीय अशुभ स्पंदनांचा त्रासही माणसाला होत नाही. करणी, जादूटोणा यांचे भय शिल्लक रहात नाही. व्यक्तिचे मन अतिशय सकारात्मक होते. आठमुखी रुद्राक्ष हा विद्यार्थी, वकिली-अकाऊंट्स-एच.आर. क्षेत्रातील मंडळी, उच्चपदस्थ अधिकारी यांना अतिशय लाभदायक आहे. सर्व क्षेत्रातील व्यावसायिक मंडळींनाही तो लाभदायक असतो.

रुद्रतंत्रानुसार सिध्द केलेला आठमुखी रुद्राक्ष स्वच्छ धूवून, रात्री झोपण्यापूर्वी एका चांदीच्या वाटीत (किंवा कोणत्याही) अर्धी वाटी पाण्यात बुडवून ठेवावा. व सकाळी उठल्यानंतर आन्हिके आवरुन, स्नान वगैरे करून पूर्वाभिमुख बसून ती वाटी समोर ठेवून रुद्राक्ष बाहेर काढून पुसुन बाजुला ठेवावा, व त्यानंतर 'अकालो मृत्युहरणं, सर्वव्याधी विनाशनम, रुद्रपादोदकं तीर्थम जठरे धारयाम्यहम' या मंत्र म्हणून ते पाणी प्यावे. या उपायामुळे रोगनाश होणे, आयुष्यवर्धन होणे, अकालमृत्युभय नष्ट होणे याला मदत होते.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**